संस्थापक-नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

संपादकीय

नवाकाळ

।। न मे भक्त प्रणश्यति ।।

# सावरकर विचारांचे अध्यासन स्थापन व्हावे

**गेली** किमान शंभर वर्षे 'स्वातंत्र्यवीर सावरकरां'च्या जयोस्तुते जयोस्तुते श्रीमहन्मंगले शिवास्पदे या गीताने देश आणि समाजाच्या महन्मंगल भावनांचा आदरच केलेला पाहायला मिळतो. सावरकरांनी त्यांच्या मनातील भावना आणि भारतमातेविषयीची प्रगाढ श्रध्दा ही या गीतातून व्यक्त केली परंतु त्या श्रध्देमध्ये तितकाच दुर्गम्य आत्मविश्वासही पाहायला मिळतो. कारण ज्यावेळेला त्यांनी या गीताच्या सुरुवातीलाच जयोस्तुते असा शब्द वापरला त्यावेळी आज ना उद्या आपली मातृभूमी स्वतंत्र होईल आणि तिचा जयजयकार नभोमंडलात निनादत राहील याचीदेखील त्यांना पूर्ण खात्री होती. ज्यावेळेला त्यांना काळ्या पाण्याची शिक्षा केली गेली आणि अंदमानमध्ये त्यांना पन्नास वर्षे शिक्षा भोगावी लागेल असे सांगितल्यानंतर सावरकर म्हणाले होते पन्नास वर्षे तुमचे सरकार टिकले तर ना. असा प्रश्न विचारून त्यांनी त्यापूर्वीच भारताला स्वातंत्र्य मिळेल हाच आत्मविश्वास व्यक्त केला होता. आज सावरकरांच्या जयंतीनिमित्ताने त्यांना अभिवादन करीत असताना या अष्टपैलू किंवा अष्टावधानी व्यक्तीमत्वाचे जेवढे गुण अभ्यासावेत तेवढे कमी पडतात. सावरकरांवर सरस्वतीचा वरदहस्त होता. वाकदेवता त्यांच्यावर प्रसन्न होती. म्हणूनच त्यांचे लिखाण आणि भाषण नेहमीच आकर्षणाचा विषय राहिले. सावरकरांचा राष्ट्रवाद हा अतिशय उघडउघड हिंदू राष्ट्रवाद होता पण त्या हिंदू शब्दामध्ये विज्ञानावर आधारित आणि कालसुसंगत देशाच्या समृध्दीची ग्वाही होती. जुन्या आणि चुकीच्या परंपरा तोडून सशक्त आणि समृध्द भारत कसा निर्माण होऊ शकेल याचे त्यांनी आयुष्यभर चिंतन केले. मॅझीनीसारख्या क्रांतिकारकाचे चरित्र अभ्यासून भारतातील तरुणांना देशाच्या स्वातंत्र्याकरीता कसे उद्युक्त करता येईल ही त्यांनी दाखवलेली दूरदृष्टीसुध्दा त्यांच्यातील दुर्दम्य इच्छाशक्तीचे निदर्शक ठरते. सावरकरांनी मांडलेल्या देशविषयक चिंतनाचा थोडा आढावा घेतला तर असे लक्षात येते की आज भारताने विज्ञानाच्या क्षेत्रात अभूतपूर्व प्रगती केली आहे. तर सैन्य किंवा शस्त्राच्याबाबतीत भारत अधिक सशक्त झाल्याने आज जग भारताकडे पूर्वीपेक्षा अधिक आदराने बघू लागले आहे.

## व्यक्तिमत्वाचे विविध पैलू

सावरकरांना अभिप्रेत असलेले स्वावलंबी आणि याच मातीशी प्रामाणिक राहाणारेच देशाचा उध्दार करू शकतात हा त्यांचा विचारही आता प्रत्यक्षात येताना दिसतो. त्यांच्या स्वप्नातल्या काही गोष्टी घडत असल्या तरी त्याकरीता त्यांनी जे अपार कष्ट सोसले त्याचा विसर पडू देता कामा नये. संपूर्ण सावरकर घराणे देशासाठी समर्पित झाले. त्यांचा हा त्याग तितक्याच प्रामाणिकतेने सन्मानित झाला पाहिजे. केवळ लोकसभेच्या सभागृहात त्यांचे तैलचित्र लावले म्हणजे आपले काम संपले असे होता कामा नये. खरे तर राष्ट्रीयतेच्या कसोट्या काय काय असू शकतात. हे सावरकरांनी अनेक ग्रंथांमधून मुद्देसूदपणे मांडले आहे. या सर्वांचा कालानुरूप अभ्यास करण्याची व्यवस्था निर्माण झाली पाहिजे. सावरकर साहित्याचे अध्ययन करणारी अध्यासने विद्यापीठांमधून स्थापन झाली पाहिजे. केवळ साहित्य संमेलन भरवून मूळ उद्देश साध्य होणार नाही. ज्यावेळेला सावरकरांची पत्रकारिता सावरकरांचे नाट्यलेखन, सावरकरांचे काव्यलेखन किंवा सावरकरांचे वैचारिक लेख एकत्रितपणे अभ्यासले जातात त्यावेळी देश, समाज या सर्वांसाठी आवश्यक असलेली नेमकी ऊर्जा कोणती किंवा शिदोरी कोणती याचे मार्गदर्शन होत राहते. दुर्दैवाने आज सावरकरांच्या समग्र अभ्यासाचे एकही केंद्र भारतात नाही. खाजगी स्तरावर होत असलेले प्रयत्न तोकडे पडतात. केंद्र सरकारने त्यात पुढाकार घेऊन अगदी अंदमानच्या सेल्युलर जेलमध्ये सावरकर विचार अध्यासन प्रकल्प राबवता येऊ शकतो. परंतु आपल्या देशातील लोकांना सावरकरांच्या नावाने राजकारण करण्यात जास्त स्वारस्य दिसून येते. म्हणून अंदमानच्या सेल्युलर जेलमध्ये सावरकर ज्योतीचे केवळ राजकारण केले गेले. यापेक्षा देशातील तरुणांना चांगली शिष्यवृत्ती देऊन अंदमानमध्ये राष्ट्राच्या सुरक्षिततेविषयी, संरक्षणाविषयी अभ्यास करण्याची संधी दिली तर ती सावरकरांसाठी सर्वात मोठी आदरांजली ठरेल. सेल्युलर जेल हे काही पर्यटन केंद्र होऊ नये ते पाहिल्यावर सावरकरांच्या विचारांचे प्रतिबिंब ते पाहाणाऱ्याच्या मनात उमटेल अशी तिथे व्यवस्था उभी करता येऊ शकते. म्हणूनच सावरकर हे व्यक्तिमत्व अनुकरण करण्याचा विषय ठरतो. सावरकरांचे विचार दीर्घकाळ अभ्यास करण्यासाठी आहेत हे सातत्याने नव्या पिढीच्याही लक्षात आणून दिले पाहिजे.

## ही तर राष्ट्रीय जबाबदारी

सावरकर म्हटल्यानंतर काही एका ठराविक गोष्टींभोवतीच त्यांचे चरित्र किंवा कार्य मर्यादित केले जाते. मार्सेलिस बोटीवरची उडी किंवा अंदमानातली शिक्षा एवढ्यापुरतेच सावरकर लक्षात ठेवले जातात. परंतु महाविद्यालयीन जीवनापासूनच विदेशी कपड्यांची होळी करण्याचा त्यांनी पुण्यात केलेला प्रयत्न किंवा अभिनव भारत सरकार चळवळीचा श्रीगणेशा करून तरुणांमध्ये पेटवलेली क्रांतिज्योत इथपासून ते इंग्लंडमधल्या निवासकाळामध्ये याच क्रांतिकार्यासाठी त्यांनी सुरु ठेवलेल्या अथक प्रयत्नांची ग्वाही देणारा होता. सावरकरांचा हा देश प्रेमाचा धगधगत्या अग्नीकुंडाचे उगमस्थान छत्रपती शिवाजी महाराज होते हे कायम लक्षात ठेवायला हवे. त्यांनी लिहीलेली छत्रपती शिवरायांवरची आरती महाराजांच्या स्वराज्य संकल्पनेचा एकाअर्थी महामंत्रच म्हणायला हवी. म्हणूनच शिवरायांपासून ते सावरकरांपर्यंत राष्ट्रउध्दाराचा जो जो काही प्रयत्न झाला त्याचा सन्मान हे प्रत्येकाचे कर्तव्य ठरते. त्यांना भारतरत्न हा बहुमान बहाल करणे ही तर सरकारची राष्ट्रीय जबाबदारीच म्हणायला हवी परंतु ती पार पाडत असताना त्यात राजकारण न आणता सावरकरांनी आयुष्यभर जपलेल्या राष्ट्रकारणाला दिलेली मानवंदना आहे. अशी भावना ठेवली गेली पाहिजे. या सर्व पार्श्वभूमीवर सावरकर विचारांचा अभ्यास म्हणजेच राष्ट्रविचारांचे संवर्धन हा दृष्टीकोन विकसित करणे देशाच्याच दृष्टीने मूलगामी ठरू शकते. काळाच्या कसोटीवर हे सगळे विचार आजही इतके लखलखीत वाटतात की त्याचा वेध घेण्याची आजच्या सरकारांमध्ये किंवा समाजातल्या बुध्दीवर्गात कुवत नाही की काय असे वाटू लागते.